**पिटीशन-ई नं. ३१/२०२४**

**CNR No. MHFC-06000254-2024**

**निशाणी क्र. १२ वरील आदेश**

सदर प्रकरणात सामनेवालाविरुध्द 'म्हणणे नाही' असा झालेला आदेश रद्द करुन सामनेवालास म्हणणे देण्याची परवानगी मिळणेस विनंती केलेली आहे.

२. सामनेवालातर्फे विधिज्ञांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुत याचिकेचे कामी सामनेवालास नोटीसची बजावणी झाल्यानंतर सामनेवाला कोर्टात हजर झाला. परंतु सामनेवाला याचे मावशीचे पती मयत झाले असल्याने दिनांक २०.०१.२०२५ रोजी सामनेवाला कोर्टात हजर राहू शकला नाही व त्यामुळे त्यास पुढील दिनांक २९.०१.२०२५ असल्याची माहिती न मिळाल्याने तो कोर्टात हजर राहू शकला नाही. सामनेवालाने सदरचा विलंब हेतूपूर्वक केलेला नाही. याचिकेचे स्वरूप विचारात घेता सामनेवालास म्हणणे दाखल करण्याची संधी न दिल्यास त्याचे अपरिमित असे नुकसान होणार असल्याने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार हिने सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जास सक्त हरकत घेतली व असे कथन केले आहे की, अर्जातील कथन बिनबुडाचे असून प्रकरणात वेळकाढूपणा करण्यासाठी सदरचा अर्ज केलेला आहे. सामनेवालाकडून योग्य तो प्रवासखर्च देऊन योग्य ते आदेश करण्याची विनंती अर्जदाराने केली आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सामनेवालाच्या कथनानुसार त्याच्या मावशीचे पती मयत झाले असल्याने दिनांक २०.०१.२०२५ रोजी सामनेवाला कोर्टात हजर राहू शकला नाही व त्यामुळे त्यास पुढील दिनांक २९.०१.२०२५ असल्याची माहिती न मिळाल्याने तो कोर्टात हजर राहू

शकला नाही.  प्रस्तुत याचिकेमध्ये उभयतांचे वैवाहिक हितसंबंध गुंतल्याचे दिसून येत आहे.  सदर परिस्थितीत सामनेवालास म्हणणे दाखल करण्याची संधी न दिल्यास त्याचे अपरिमीत असे नुकसान होईल.  सामनेवालास म्हणणे दाखल करण्याची संधी दिल्यास याचिका गुणावदोषावर चालणेस व अंतिम निकालाच्या वेळेस त्याचा फायदाच होईल.  त्यामुळे सामेनवालास म्हणणे दाखल करण्याची संधी देणे उचित ठरेल.  सबब, आदेश.

## आदेश

सामनेवालाने म्हणणे दाखल करून विनाविलंब प्रकरण पुढे चालवण्याच्या अटीवर अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

AMRUTA AMOL SHINDE

Digitally signed by AMRUTA AMOL SHINDE
Date: 2025.02.21 10:58:02 +0530

दिनांक - १२.०२.२०२५

(अमृता अ. शिंदे)
न्यायाधीश,
कौटुंबिक न्यायालय, रायगड-अलिबाग